# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीचा प्रचाराने वेग घेतला आहे. उमेदवार आणि विविध राजकीय पक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर करत आहेत. पारंपरिक जाहीर सभा, प्रचारफेरी आणि पदयात्रांसोबतच आता निवडणूक प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्सचा समावेश केला जात आहे.मतदारांची ओळख पटवणं, त्यांच्या गरजा समजून घेणं तसच राजकीय पक्षांनी राबवलेल्या विकासकामांची माहिती प्रभावीपणे मांडण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. पुणे शहरात भारतीय जनता पक्षाने केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार करण्यासाठी एआय–आधारित चित्रफितींच्या माध्यमातून व्यापक प्रचार मोहीम सुरू केली आहे. तर काँग्रेस पक्ष आपल्या सामाजिक माध्यम सेलच्या माध्यमातून डिजिटल जनसंपर्कावर भर देत आहे. विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रील्स, चित्रफित आणि डिजिटल संदेशांच्या माध्यमातून पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचवली जात आहे.

****

देशभरात आज प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जात आहे. ज्यामध्ये भारताच्या विकासात आणि अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या अनिवासी भारतीयांचा सन्मान केला जातो. नऊ जानेवारी १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते,या घटनेचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि जागतिक स्तरावर देशाचा प्रभाव वाढवण्यात प्रवासी भारतीयांचं योगदान यानिमित्त अधोरेखित केलं जातं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रवासी भारतीय दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय प्रवासी समुदाय भारत आणि जग यांच्यातील एक मजबूत सेतू असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. प्रवासी भारतीयांना भारताशी अधिक जवळ आणण्यासाठी सरकारनं अनेक महत्त्वाची पावलं उचलली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

****

जनगणना हे राष्ट्रीय कार्य असून,हे काम कर्तव्य भावनेनं करावं आणि आपला सक्रीय सहभाग नोंदवावा,असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जनगणना २०२७ कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते आज बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालय, विविध शासकीय कार्यालयं, नगरपालिका, तहसिल कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांनी यात सहभाग घेतला.जनगणना २०२७ ही दोन टप्प्यात होणार असून, पहिल्या टप्प्यात घरांची गणना होईल.हा टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पार पडेल. यंदाची जनगणना संपूर्ण डिजिटल पद्धतीने करण्यात येणार आहे.

****

हिंगोली इथं उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने आज रस्ते सुरक्षा अभियानाअंतर्गत वाहन चालकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. परिवहन विभागाचे अधिकारी राहुल गावडे यांच्या हस्ते या शिबिराचं उद्घाटन झालं. दुचाकी किंवा चारचाकी वाहनांवर पांढरे शुभ्र एलईडी वापरल्याचं दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा गावडे यांनी यावेळी दिला.

****

बीड जिल्ह्यात आष्टी, पाटोदा आणि शिरूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी, मजूर आणि सामान्य नागरिकांचं प्रचंड नुकसान झालं असूनही शासनाकडून ठोस मदत मिळत नसल्याच्या निषेधार्थ आष्टी तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आलं. हे आंदोलन माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखाली झालं. विविध गावांतले शेतकरी, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

****

लातूर जिल्ह्यात अहमदपूर तालुक्यातल्या चापोली इथल्या रामगिर महाराज मठ संस्थांनाला भरीव निधी देऊन विकास करणार, असं मंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल चापोली इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. आगामी काळात पाणंद रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात काम होणार असून अहमदपूर मतदारसंघात आगामी वर्षभरात दोन नवीन कारखान्याची निर्मिती होणार आहे, असं पाटील म्हणाले.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही. सिंधूनं महिला एकेरीत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात सिंधूनं पहिला गेम २१-११ असा जिंकला असतानाच, तिची प्रतिस्पर्धी जपानच्या अकाने यामागुचीनं दुखापतीमुळे सामन्यातून माघार घेतली. त्यामुळे अवघ्या ११ मिनिटांच्या खेळानंतर सिंधूला विजेता घोषित करण्यात आलं.

****

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहेत. काल पुरूषांच्या बीच सॉकरमध्ये अंदमान आणि निकोबारला हरवून महाराष्ट्राने उपांत्य फेरीत प्रवेश केला. पेंचक सिलट मधील रेगु प्रकारात महाराष्ट्राने दोन रौप्य पदकांची कमाई केली.

****

महिला क्रिकेट प्रीमियर लीग – डब्ल्यूपीएल च्या चौथ्या हंगामाला आजपासून सुरुवात होत आहे. सलामीचा सामना विद्यमान विजेता मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे.

****